

# पुन्हा एक जन्म हवा

मालवते ज्योत आज कायेची
तेज तुझा तापून घ्यावा
वात बनूनी तेवाया
पुन्हा एक जन्म हवा

संपली आस माझी जरी
श्वास तुला लोटून जावा
हात धरून चालाया
पुन्हा एक जन्म हवा

विरेल मातीत सिंदूर माथीचा
स्पर्श तुझा कपाळी व्हावा
लेण सौभाग्याच लेवाया
पुन्हा एक जन्म हवा

सुटली सोबत आपुली इथेच
मधुमीलनाचा गंध तुझ्यात उरावा
रात गुलाबी भोगाया
पुन्हा एक जन्म हवा

कोमेजेल पुष्प या सांजेला
नवकळ्यांत आपुला रंग भरावा
सोनू-मोनू संगे खेळाया
पुन्हा एक जन्म हवा



**राघवेंद्र श्रीकृष्ण वंजारी**
सोलापूर
मो. ९०२८७६९१८२

